

''प्रेमाने मग मला उठवितो, बिछान्यात मज आणून देतो''

**प्रसंग -**

नायिका नम्बर ३, म्हणजे 'अलका', नवऱ्यावर एकदम खूष. तिच्या मैत्रिणी तिला नेहमी चिडवतात. ''संतोषी माते'' चा तू नेहमी उपास करते म्हणून तुला येवढा चांगला नवरा मिळाला, बरं का अलका आनंदाने गाणे गात मैत्रीर्णींना सांगत आहे ---



# घरात असला नवरा ....

(चाल - घरात हसरे तारे असता, पाहू कशाला नभाकडे)

अलका - घरात असला नवरा असता, शीणू कशाला कुणाकडे
''रामा'' शोधू कशाला सांगा गडे

रोज सकाळी लवकर उठतो, ब्रेकफास्ट तो झटपट करतो
प्रेमाने मग मला उठवितो, बिछान्यात मज आणून देतो
चहा टोस्ट अन् मस्त आमलेट, कधीतरी करतो हा मेदूवडे
मी शीणू कशाला कुणाकडे, घरात असला नवरा ...

कामाहून घरी उशीरा येतो, गुलाब तरी मज रोज आणतो
जेवण करीतो, बशा विसळतो, इस्त्री, लॉन्ड्री अन् व्हॅक्यूम करीतो
कसे बरे सारे जमते ह्याला हे, प्रश्न मला हा नेहमी पडे
मी शीणू कशाला कुणाकडे, घरात असला नवरा ...

''मनोजसमं'' तो गोड हासतो, मुकेशची तो गाणी गातो
अमिताभाची नक्कल करतो, राजेश खन्ना चक्क तो दिसतो
मैत्रीणी माझ्या म्हणती कशा त्या, लकी किती तुला असा नवरा मिळे
मी शीणू कशाला कुणाकडे, घरात असला नवरा ...